महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन आदेश क्रमांकः १११८ /प्र.क्र. ०१/१४-ब

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

तारीख: १७ फेब्रुवारी, २०१८

संदर्भ :- १) या विभागाचे समक्रमांक दिनांक ०८.०२.२०१८चे आदेश

२) सा.प्र.वि. शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र. १८६/१४-ब, दिनांक ०९.०८.२०१६

३) सा.प्र.वि. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१८६/१६/१४, दिनांक २३.१२.२०१६

शासन आदेश

संदर्भाधीन क्रमांक १ च्या आदेशान्वये खालील विवरणपत्रातील नमूद कक्ष अधिकारी यांची प्रशासकीय कारणास्तव बदलीने पदस्थापना वित्त विभागामध्ये करण्यात आली आहे. तथापि, सदर कक्ष अधिकारी यांना संबंधित विभागामधून अद्याप कार्यमुक्त करण्यात आलेले नाही.

अ.क्र.	श्री/ श्रीमती	कक्ष अधिकाऱ्याचे नांव	सध्याचा विभाग	बदलीनंतरचा विभाग
१	२	३	४	५
१	श्री	नं. ग. आंदळकर	जलसंपदा विभाग	वित्त विभाग
२	श्री	ग.सु.कुलकर्णी	सार्वजनिक आरोग्य विभाग	वित्त विभाग
३	श्री	सं.म.महाडीक	महसुल व वन विभाग	वित्त विभाग

संदर्भाधीन क्रमांक २ व ३ येथील शासन परिपत्रक/ शासन निर्णयाच्या अनुषंगाने उपरोक्त ०३ कक्ष अधिकाऱ्यांना त्यांच्या नावासमोरील रकाना क्रमांक ४ येथील विभागातून रकाना क्रमांक ५ येथील बदलीच्या विभागात रुजू होण्यासाठी दिनांक २०.०२.२०१८ (म.पू.) पासून एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. उपरोक्त कक्ष अधिकाऱ्यांनी इतर कोणत्याही आदेशाची प्रतिक्षा न करता त्यांच्या नावासमोर **रकाना क्रमांक ४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या विभागात तत्काळ रूजू व्हावे.**

म.ना.से. (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ चे नियम १२ मधील तरतुदीनुसार उपरोक्त कक्ष अधिकारी यांना पदग्रहण अवधी अनुज्ञेय नसल्याने, ते बदली झालेल्या वित्त विभागात तत्काळ रुजू झाले नाहीत तर, त्यांच्या अनुपस्थितीचा कालावधी सेवाखंड धरण्यात येईल.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१७१७४९५०४९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2018.02.17 17:49:56 +05'30'

(ग. भि.गुरव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व संबंधित कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई.

प्रत,

१. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (आस्थापना), संबंधित मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई (संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)
३. सह/उप सचिव (आस्थापना), संबंधित मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. निवडनस्ती.